B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 240 (CCXL)
ISSN : 2278-9308
July,2020

# संत एकनाथांचे भागवत तत्वज्ञान

डॉ. जयश्री शास्त्री
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा

महाराष्ट्रातील संत प्रवाह धारेत संत एकनाथाचे स्थान लक्षणीय स्वरुपाचे आहे. प्रपंचच परमार्थमय कसा होतो याचे उदा. म्हणजे नाथचरित्र होय. एकनाथ हे जसे थोर भागवद्भक्त 'भागवतोत्तम' आहेत तसे 'धन्यो गृहस्थाश्रमः' हे वचन पूर्णार्थाने सार्थ करणारे श्रेष्ठ गृहस्थाश्रमी आहे. असे थोर अभ्यासकाचे त्यांच्या विषयीचे आकलन आहे. नाथ हे संत आहे. हे सर्वज्ञातच परतु ते एक थोर स्वानुभवी तत्वज्ञ आहेत. हे अधिक महत्वाचे तत्वज्ञान म्हणजे जीवन दृष्टी अशी भारतीय तत्वज्ञाची धारणा आहे. मराठी संतांचे एक वैशिष्ट्य असे की, त्यांच्या भक्ती—दर्शनाची उभारणी अद्वैती तत्वज्ञानाच्या भक्कम पायावर झालेली आहे. ज्यांची जीवनदृष्टी जितकी निर्दोष तितके त्यांचे आचरण व एकुणच जीवन निर्दोष होऊन जिवनाचे परम प्राप्तव्य निश्चित करणे सोपे जाते. हा या मागचा विचार. 'ज्ञानदेवे रचिला पाया' यात सुचविल्याप्रमाणे संत ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा तात्विक पाया घातला त्याचेच विस्तारित आणि सोपी मांडणी नथांनी आपल्या विपूल वाङ्मयामधून केली आहे. एकनाथाच्या श्रीमद्भागवत महापुराणाशी असलेला आंतरिक जिव्हाळ्याचा साक्षात संबंध सर्वज्ञात आहे. त्यांच्या सर्व श्रेष्ठ विद्वत्मान्य तसेच लोकमान्य ग्रंथ 'एकनाथी भागवत' या नावांनी प्रसिद्ध आहे. श्रीमद्भागवताच्या एकादश स्कंधावरील अद्वितीय भाष्य म्हणजे 'एकनाथी भागवत' होय. जे नाते ज्ञानेश्वरीचे भगवद्गीतेशी आहे. तेच एकनाथी भागवताचे श्रीमद्भागवताच्या एकादश स्कंधाशी आहे. भगवान श्रीकृष्णाने उद्धवाला सांगितलेली ही गीता, हा स्कंध मूळात 'मुक्तिस्कंध' किंवा 'ज्ञानस्कंध' प्रसिद्ध आहे. मूळ स्कंधाची लोकसंख्या १३६७ एवढी असून त्यावरील नाथांची टीका ज्ञानेश्वरीपेक्षा दुप्पट, १८७७४ ओव्यांची आहे. त्यात भागवताधारे तत्वज्ञांची केलेली मांडणी विस्तृत आणि सिद्धांत तसेच दृष्टांत अशा दोन्ही अंगांनी समृद्ध असणे सहाजिकच आहे.

श्रीमद्भागवताशी साक्षात संबंधित त्यांचा दुसरा महत्वाचा ग्रंथ म्हणजे 'चतु:श्लोकी भागवत' होय द्वितीय स्कंधातील ज्या नवव्या अध्यायात चतु:श्लोकी भागवत समाविष्ट आहे. त्या संपूर्ण अध्यायावरच (४४ श्लोकांवर) नाथांनी टीका लिहिली असून तिची ओवी संख्या १०३६ आहे. अद्वैत तत्वज्ञानाची परिभाषा उपयोजून नाथांनी केलेले भागवताच्या सारभूत चतु:श्लोकीवरील हे अप्रतिम भाष्य म्हणजे नाथांच्या तत्वज्ञानांचा गाभाच होय. त्या व्यतिरिक्त 'हस्तामलक' टीका 'स्वात्मसुख', 'आनंदलहरी' आणि 'शुकाष्टक' ही प्रकरणे तत्वज्ञाचीच आहे. 'हस्तामलक' टीका म्हणजे शंकराचार्यांचा 'हस्तामलक' या स्तोत्रावरील टीका होय. 'भावार्थ रामायण' या बृहत्ग्रंथातील प्रसंगोत्पात्त तत्वज्ञाचे प्रतिपादन केलेले आढळते असे असेल तरी श्रीमद्भागवताशी असलेल्या एकनाथांच्या वैचारिक अनुबंधाचा परामर्श घेऊन एकनाथी भागवताचे तत्वज्ञ विशद करणे हा उद्देश असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणात प्रामुख्याने 'चतु:श्लोकी भागवत' आणि 'एकनाथी भागवत' यांच्या आधारे नाथांच्या अद्वैती तत्वज्ञानांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्रीय संतानी त्यांच्या साहित्य प्रगटनात शंकराचार्यांच्या तत्वज्ञानाचा स्वीकार केलेला दिसतो. संत एकनाथांनी शंकराचार्यांना प्रारंभी स्पष्ट शब्दात वंदन केलेले आहे. जसे ''वंदू आचार्य शंकरु । जो का ग्रंथार्थ विवेकचतुरु ।

सारुनि कर्मठतेचा विचारु । प्रबोध दिनकरु प्रकाशिला ।। (११७) ज्या अर्थी संत ज्ञानेश्वर ''भाष्यकाराते वाट पुसतू ।'' असे वचन उदधृत करतात तेव्हा भाष्यकार शंराचार्यच होत असे

मानले जाते किंवा एकनाथांनी शंकराचार्यांना वंदन केले आहे म्हणजे त्यांचे तत्वज्ञान अद्वैती तत्वज्ञान होय. भक्तिदर्शनाचा, भागवतधर्माचा, आधारभूत असलेल्या प्रस्थान स्वरूप ग्रंथ म्हणजे श्रीमद्‌भागवत महापुराण त्यामध्ये प्रतिपादन केलेले तत्वज्ञान अद्वैती आहे. अशी नाथांची धारणा असल्याने भागवताच्या माध्यमातून त्यांनी अद्वैताची मांडणी केली आहे. एकनाथांनी एकादश स्कंधाआधीच 'चतु:श्लोकी भागवत' ही दुसऱ्या स्कंधाच्या ९ व्या अध्यावरील असली टीका लिहिली आहे. त्यामुळे नाथांच्या तत्वज्ञाप्रमाणे श्रीमद्‌भागवताच्या भूमिकेवरही प्रकाश पडतो. जसे एकादश स्कंधावरील आपली एकाकार टीका लिहितांना भागवताचे रसाळ व मर्मज्ञ टीकाकार आचार्य श्रीधरस्वामी यांच्या भावार्थदीपिकेंच्या प्रकाशात वाटचाल केल्याचे नाथ आवर्जून सांगतात. ग्रंथारंभी त्यांना वंदन करतात. नाथ म्हणतात ''आता वंदू श्रीधर । जो भागवत व्याख्याता सधर । जयाची टीका पाहता अपार । अर्थ साचात पैलाभे ।'' श्रीधराचार्य हे शंकर अद्वैती परंपरेतील आहेत ही गोष्ट प्रस्तुत संदर्भात महत्वाची आहे.

भगवान नारायणाने कल्पाच्या आरंभी ब्रम्हदेवास जो आत्मज्ञानाचा उपदेश केला तो भागवतकारांनी चार श्लोकांत निबद्ध केला आहे. संपूर्ण भागवताचे सार ते सार असल्याने त्यास ''चतु:श्लोकी भागवत'' असे म्हटले जाते त्यात अद्वैती तत्वज्ञानाचा गाभा साठविला आहे. एकनाथ महाराज सांगतात, ''अज्ञाने जीवा जीवभाव । त्यासी द्यावया निजात्म ठाव । शुक सांगे सुगम उपाव । इतिहास पहा हो हरी विरंचिता ।।'' (३७) ''जीव ज्ञानस्वरुप सत्य ज्ञानी । परी तो झाला देहाभिमानी । ज्ञान वेचले विषयध्यानी । यालागी दृढ बंधनी तो पडला ।।'' (४२) अज्ञानामुळे बंध व 'ज्ञानान्मोक्ष:'' ही वेदांतांची तत्वे नाथांनी स्पष्टपणे सांगितली आहेत आणि ज्या ज्ञानांने संसार बंधनातून वा दु:खत्रयापासून मुक्ती मिळते व जीव स्वानंदी निमग्न होतो. त्या आत्मज्ञानाचे म्हणजेच ब्रम्हज्ञान वा ईश्वरज्ञानांचे विवेचन चतु:श्लोकांच्या भाष्यरुपाने ते करतात. हे ज्ञान प्राप्त होण्यासाठी चित्तशुद्धीची आवश्यकता आहे व त्यासाठी भगवद्‌भक्तीशिवाय पर्याय नाही. ''त्या चित्तशुद्धीलागी जाण । भावे करावे भगवत्‌भजन । कां गुरुदास्य करिता पूर्ण । परब्रम्ह जाण पायां लागे ।।'' (८३) वेदांत दर्शनात अधिकाऱ्यासंबंधीची जी चर्चा केली जाते तीच नाथांनी ब्रम्हदेवाच्या संदर्भात केलेली दिसते. पुढे परब्रम्ह नारायणाचे दर्शन झाल्यावर स्तुती करतांना ब्रम्हदेव म्हणतात, ''...तुझे सूक्ष्म स्वरुप निर्गूण । आणि स्थूल तेही तूचि आपण । हे अभेद निजज्ञान । सांगिजे मज ।। तु चिन्मात्र मायायोगे । न होऊनी जग होसी अंगे । ब्रम्हा विष्णू रुद्रादी वेगे । रुपे अनेगे तु धरीसी ।। न मोडता सोने पण । जेवी लेणे होय सुवर्ण । तेवी सोडुनी पूर्णपण । जगा संपुर्ण तू होसी ।।'' (३२५—२८—२९)

एकनाथ महाराजांच्या वाङ्‌मयामधून अद्वैत तत्वज्ञानाचाच स्वीकार केल्याचे दिसून येते अर्थात या अद्वैती तात्विक पायावर अद्वैती ज्ञानभक्तीने ओतप्रोत अशा भागवतधर्माची उभारणी करणे हे संत एकनाथांचे जीवितकार्य होते. चतु:श्लोकीतील पहिल्याच श्लोकावरील भाष्यात नाथ सांगतात,

''सृष्टपूर्वी मी निजरुप । शुद्ध ब्रम्ह निर्विकल्प ।
ज्ञानसंकध स्वरूप । पूर्णत्वे पूर्ण अमूप मीचि स्वये ।।'' (४४२)

खरे तर ब्रम्ह हे वर्णनातीत आहे सत — असत्, चित् — अचित् इ. द्वंद्वाच्या ते अतीत आहे. मायेमुळेच जेजे द्वैत किंवा द्वंद्व भासते हे व्यक्त करतांना नाथ चतु:श्लोकीत म्हणतात. ''सत म्हणजे सूक्ष्म मूळ । असत् म्हणजे नश्वर स्थूळ । या अतीत मी निर्मळ । या नाव केवळ सृष्टीपूर्वी ।। सांजवेळे पडिला दोर । त्या ती म्हणती सर्प थोर । ते मी पूर्ण ब्रम्ह परमेश्वर । त्या माते संसार मानवी म्हणती ।।'' (४५१—५३) नाथांनी येथे अद्वैत दर्शनातील रज्जू सर्पांचा दृष्टांत दिला आहे. उपनिषदांमध्ये जगाला नाम—रूप म्हटले आहे. नाथांनी नाम—रूप स्वरुपाचा स्पष्ट उल्लेख केला आहे. ते म्हणतात, ''जगाचे जे नाव—रूप । तो मी परमात्मा चित्स्वरुप ।''

माझ्या निजांगाचे स्वरूप ते विश्वरूप स्वरे भासे । (४५५) मायेचे स्वरूपही नाथांनी फार सुरेख विशद केले आहे. त्या सर्वच ओव्या महत्वाच्या आहे. त्यातील काही महत्वाच्या ओवी अशा ''माया सत् ना असत् । शेखी नवे सदसत् । माया मिथ्यत्वाचे मथीत । जाण निश्चित विधातया ।। ...माया वांझेचे लाडके बाळ । माया गगन सुमनांची माळ । माया मृगजळाचे शीतळ जळ । माया ते केवळ गंधर्व नगर ।। ...'' (४८४, ४८७) ''मी परमात्मा जे अधिष्ठान । त्या मज सत्यार्थते न देखोण । जें जें देखिजे द्वैतभान । माया जाण विरंची ।। ... (४९२, ४९६) एकनाथांच्या मते या मायेचे निवारण करुन ब्रम्हत्मैक्य प्राप्तीसाठी जर कोणी समर्थक साहाय्यक असेल तर सद्गुरु ! असे उद्‌बोधन करून, ''एवं सद्गुरुकृपेपुढे । माया मशक बापुडे । त्यांच्या वचनार्थे सुरवाडे । मायाही रोकडे ब्रम्ह होये ।।'' (५२१) त्याचप्रमाणे परमात्मा हा चराचर विश्वात भरुन राहिला आहे. याचा मार्मिक अर्थ विशद करतांना नाथ म्हणतात, ''...व्याप्य मज वेगळे उगे लाहे । मा मी व्यापकू व्यापूनि राहे । हे वार्ता मजमाजी न साहे । जगद्रूप मी स्वयें चिदात्मा एका ।।''(५५०)

एकनाथी भागवतातील एकादश स्कंधावर जे भाष्य नाथांनी केले आहेत त्यातही अद्वैती तत्वज्ञाचाच विचार त्यांनी केला आहे. मूळ भागवतामधील श्लोकातच अन्वय आणि व्यतिरेक अशा दोन्ही अंगांनी तत्त्व जाणून घ्यावे असे म्हटले आहे एक परमात्माच सर्वत्र भरून राहिला आहे हा अन्वय तर त्याच्या शिवाय दुसरे काहीही सत्य नाही हा व्यतिरेक, दोन्ही मिळून तत्वज्ञान पूर्ण होते. नाथांनी दिलेले स्पष्टीकरण म्हणजे, ''अन्वय जाणणे जयाते । वस्तूपासोनी तत्वे समस्ते । उपजती तद्रुप निश्चिते । कार्यकारणतत्वे अभिन्न ।।''(५७९) एकमेव निरुपाधिक, निष्कल, निर्विशेष परात्पर ब्रम्हच केवळ सत् आहे आणि जे जे भासते ते ते सर्व स्वरुपत: ब्रम्हच आहे. हा एकनाथांच्या तत्वज्ञानाचा केन्द्रवर्ती सिद्धांत आहे. अद्वैत दर्शनात भेद तीन प्रकारचा मानला असून ब्रम्ह पूर्णपणे भेदरहित असल्याचे सांगितले आहे. एकनाथ स्पष्टपणे सांगतात, अद्वैत दर्शनात भेद तीन प्रकारचा मानला असून ब्रम्ह पूर्णपणे भेदरहीत आहे. त्यासाठी ते दाखला देतात, ''विजातीय भेद ते ठायी । नसे सजातीय भेद काही । स्वागत भेद तोही नाही । भेद शून्य पाही ये रीती ।।'' (९–१७) तात्पर्य असे ब्रम्ह हे सजातीय, विजातीय स्वागत भेद शून्य आहे. जर ब्रम्हतत्व हे एकमेवाद्वितीय व शब्दातीत आहे, तर त्याच्या विषयी शास्त्र तरी कशा प्रकारे विवेचन करणार त्यासाठी वेदांत शास्त्रात एक खास पद्धत स्वीकारली जाते; तिला 'अध्यारोपापवाद' असे नाव आहे. परब्रम्हापेक्षा जे जे भिन्नत्वाने प्रत्येकाला येते ते ते ब्रम्हावर केलेला आरोप अध्यारोप आहे. आणि ब्रम्हाहून वेगळे अस्तित्व – सत्ता – त्या आरोपित पदार्थाला नसते असे सांगून द्वैताचा निरास करणे याला अपवाद म्हणतात. असे सांगून द्वैतचा निरास करणे याला अपवाद म्हणतात जसे रज्जू सर्पाच्या दृष्टांतात रज्जूवर सर्पाचा आरोप (अज्ञानाने) केला जातो; ज्ञान झाल्यावर त्याचा भ्रम म्हणून निरास होतो, अपवाद होतो. नाथ सांगतात, ''एवं पिंड ब्रम्हांड खटाटोप । हा अवघाची आरोप । दोरु झाला नाही साप । भ्रमें सर्प तो म्हणती'' (९–२८५) आत्मवस्तूवर जे जे भासते ते आत्मा नव्हे असे अपवादाचे विवेचन केले आहे. पांचभौतिक देह, अहंकार, जीवत्व, माया, एवढेच काय पण ''ब्रम्हाहमस्मि'' हा सात्विक अभिमानही परमात्मा नाही असा अपवाद केला आहे. ''जितुका तत्वांचा अनुवादू । तितुका मजवरी अपवादू ।।'' असे अवभूत यदूला सांगतात तेव्हा दैवताचा निरास झाला म्हणजे वृत्ती अद्वैतात विलीन होते, खरे तर अद्वैत ही द्वैत 'सापेक्ष' असल्याने आत्मा हा द्वैताद्वैतातीत अशा निर्विशेष स्वरुपी स्थित होतो.

''तो ज्ञानरुप हा स्वप्रकाश । अविकारी अविनाश ।
अकार्ता अभोक्ता उदास । निर्विशेष निजरुप ।। (१०–३६५)

एकनाथांनी 'चतु:श्लोकी' प्रमाणेच भागवतातील 'माये' ची स्वतंत्रपणे चर्चा नाथाने केली आहे जसे ते म्हणतात,

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 240 (CCXL)
ISSN : 2278-9308
July,2020

''माया म्हणावी येणे भावे । जे मी कदा विद्यमान नव्हे ।
यालागी अविद्या येणे नावे । वेदानुभवे गर्जती शास्त्रे ।। ...
सत् म्हणो तरी ते नासे । असत् म्हणो तरी आभासे ।।...
शिवी जे योग माया विख्याती । जिवी तिथे अविद्या म्हणती ।
हे चि मायेची मुख्यत्वे भ्रांती । स्वप्न स्थिती संसारु ।।''

शंकराचार्यांच्या तत्वज्ञानाचा गाभा म्हणजे ''अध्यासवाद'' होय. जे नाही ते भासणे हे अध्यासाचे सामान्य स्वरूप आहे. देहात्म बुद्धी हे अध्यासाचे मूळ स्वरूप सांगितले जाते (१०–१०) उपरोक्त भाषा नाथांनी श्रीधराचार्यांना अनुसरुन 'अध्यास' संकल्पनेचा उपयोग केला आहे. देहादी अध्यास आपल्या ठायी श्रवणे म्हननें मिथ्या केल्या पाही'' (११–२१) अध्यासाप्रमाणेच 'विवर्त' या संकल्पनेचाही स्पष्ट उल्लेख करुन नाथ सांगतात, ''माझ्या स्वरुपाचा विवर्तु ते मन । हे अभिन्न खूण कळेना (१३–२४) अद्वैत तत्वज्ञानात मायावादाची परिणती अजातवादात होते ते सर्वश्रुत आहे. एकनाथांच्याही तत्वज्ञानात अद्वैत्वाचे हे टोक गाठलेले दिसते.

एकूणच उपरोक्त उदा. बघता असे नक्कीच म्हणता येते की एकनाथांचे तत्त्वज्ञान शंकराचार्यांप्रमाणेच केवलाद्वैती स्वरुपाचे आहे. 'ब्रंम्ह सत्यं' 'जगन्मिथ्या' व 'जीवो ब्रम्हैव' हे तीनही सिद्धांत एकनाथांनी स्पष्टपणे मांडले आहे. सिद्धांतांनूसारच रज्जुसर्पादी सर्व दुष्टांतही त्यांनी दिले आहेत. तसेच ज्यात माया, अविद्या, अध्यास, विवर्त इत्यादींचा उल्लेख करता येईल अशा केवलादैवताच्या सर्व महत्वाच्या संकल्पनांचे स्पष्टीकरणही त्यांनी केले आहे. एकनाथ हे सर्वार्थाने अद्वैत वेदांती आहेत त्यांच्या विवेचनाचे एक वैशिष्टय अत्यंत मोलाचे आहे. ते म्हणजे एकनाथांनी श्रीमद्भागवताच्या भाष्याच्या रूपात ते विवेचन केले आहे. वास्तविक भागवत हे भागवत धर्माचे, भक्ती संप्रदायाचे प्रस्थान आहे. 'ज्ञानस्कंधाच्या व मूलभूत चतु:श्लोकीच्या भाष्यातून अद्वैताचे तत्त्वज्ञान सांगणे, प्रकट करणे हे नाथांचे वैशिष्टये आहेत. पण त्यावरुन श्रीमद्भागवतातील तत्वज्ञानावरही प्रकाश पडतो असे डॉ. शं. रा. तळघट्टी यांनी म्हटले आहे. एकूणच भागवताचे महात्म्य तत्वज्ञानाच्या आधारे एकनांथानी व्यक्त केलेले आहे. या तत्वज्ञानामुळे एकनाथाच्या 'चतु:श्लोकी भागवत' आणि एकादश स्कंधाची मौलिकता अधिक वाढली. एकूणच संत एकनाथांचे वाङ्मयीन तत्वज्ञान हे लोकोपदेशक बौद्धिक आणि भावनिक समाधान देणारे म्हणून महत्वाचे ठरते.

संदर्भ :–

१) श्रीमद्भागवत आणि मराठी संत डॉ. शं. रा. तळघट्टी २००६
२) नाथांचा भागवतधर्म, डॉ. श्री. रं. कुलकर्णी एकनाथ संशोधन मंदिर, १९५८
३) भागवत संप्रदाय, पं. बलदेव उपाध्याय, २०१०
४) सार्थ श्री. एकनाथी भागवत, कु. ना. आठल्ये, २०००